MHSI080001292022

दाखल तारीख : १२/०२/२०२२
नोंदणी तारीख : १२/०२/२०२२
निकाल तारीख : ०८/०५/२०२६
कालावधी : व. म. दि.
०४ ०२ २६

**नियमित फौजदारी खटला क्र. १४/२०२२** **निशाणी क्र. –**

नमुना क्रमांक ३२ भाग 'अ'

**न्यायनिर्णय**

(फौजदारी नियमावलीचे परिच्छेद क्रमांक ४४ (१) प्रकरण क्रमांक ६)

| | |
|---|---|
| **विद्यमान न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग कणकवली तालुका कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग.**<br>(पिठासीन अधिकारी श्री. शुभम जी. लट्टुरिया)<br>**(दिनांक ०८/०५/२०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्रमांक १४/२०२२)** | |
| (गुन्हा क्रमांक १६/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ३६३ व ५०६ प्रमाणे पोलीस ठाणे, कणकवली) | |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे, कणकवली<br>तालुका कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग. |
| सरकार तर्फे | श्री.एन.एस.कुंटे, विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | मयुर विकास राणे, वय – २१ वर्षे,<br>रा. चौंडेश्वरी अपार्टमेंट, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग |
| आरोपी तर्फे | विद्वान वकील श्री.जी.आर.पारकर |

भाग 'ब'

(फौजदारी नियमावलीचे परिच्छेद क्रमांक ४४ (२) प्रकरण क्रमांक ६ )

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेल्याची तारीख | २१/०१/२०२२ |
| प्रथम छापील खबर दिनांक | २२/०१/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १२/०२/२०२२ |
| दोषारोपपत्र निश्चिती दिनांक | ०६/११/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०९/२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०८/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावणीची तारीख, असल्यास | -- |

## आरोपीचा तपशील

| आ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटणेची तारीख | गुन्हयाचे आरोप सह | निर्दोष असो वा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करिता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयुर विकास राणे | २२/०१ /२०२२ | | भा.द.वि. कलम ३६३ व ५०६ प्रमाणे | निर्दोष | निर्दोष सोडण्यात आले. | -- |

**<u>अभियोग पक्षातर्फे घटनेबाबत थोडक्यात हकीकत अशी की</u>** :-

१. दि.२१/०१/२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता फिर्यादी यांची मुलगी अमृता ही फिर्यादीचे पत्नीस सुप बनवण्यासाठी कोंबडीचे पाय आणण्यासाठी जाते असे सांगून घरातून निघून गेली ती परत घरी न आल्याने व तीचा मोबाईल बंद दाखवत असल्याने तीचा गावात तसेच शेजा-यांकडे, नातेवाईक यांचेकडे शोध घेऊन ती मिळून आली नाही. ती घरातून निघून गेली असावी किंवा तीला अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेली असावी

म्हणून म्हणून फिर्यादीने कणकवली पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द फिर्याद दाखल केली.

२. फिर्याद दाखल झाल्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक १६/२०२२ नोंद होवून चौकशी सुरु झाली. गुन्हयाचा तपास पोलिस उपनिरीक्षक डी.एस.पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी घटनास्थळी भेट देवून घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांची तपास टिप्पणे नोंदविली. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३६३ व ५०६ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

३. माझे विद्वान पुर्वपीठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाण क्र.१० कडे वरील कलमानुसार दोषारोप ठेवला असता त्यांनी गुन्हा कबूल नाही असे सांगून खटला चालविण्याची मागणी केली. आरोपीच्या विरुध्द दोषसिध्दीदर्शक पुरावा आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नि.क्र.२६ वर नोंदविण्यात आला आहे. त्यात आरोपीने खोट्या केसमध्ये अडकवण्यासाठी खोटे सांगत आहे असे कथन केले आहे.

४. याकामी उपस्थित होणारे मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविलेली आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे का की, | |

| | | |
|---|---|---|
| | दि.२१/०१/२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता कनकनगर, ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग येथून आरोपीने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हीस फिर्यादीचे संमत्तीशिवाय त्यांचे कायदेशीर देखरेखीतून पळवून नेवून अपनयन केले ? | ...नाही |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, वर नमूद घटने दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे मुलीस फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जीवे मारणची धमकी दिली? | ...नाही |
| ३ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

५. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले आहेत. अभियोग पक्षातर्फे तोंडी पुराव्या व्यतिरिक्त काही कागदोपत्री पुराव्यावर त्यांची भिस्त ठेवली आहे. सदरच्या कागदपत्रांचा उल्लेख न्यायनिर्णयामध्ये आवश्यक त्या ठिकाणी करण्यात येईल.

६. अभिलेखाचे अवलोकन केले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दे क्र. १ व २ करीताः–</u>**

७. मुद्दे क्र. १ व २ हे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांचे निष्कर्ष एकत्रीतरित्या देण्यात येत आहेत.

८. साक्षीदार क्र. १ फिर्यादी यांनी आपल्या पुराव्यात सांगितले आहे की, दिनांक २१/०१/२०२२ रोजी ते कामावर गेले होते व दुपारी एक वाजता कामावरुन घरी जेवणाकरीता आले होते. तेव्हा त्यांची मुलगी घरी नव्हती. तेव्हा त्यांनी मुलीला फोन केला परंतु तिने त्यांचा फोन उचलला नाही. तेव्हा त्यांनी परत चार वाजता तिला फोन केला तेव्हा तिने तो फोन उचलला तेव्हा मैत्रिणीकडे आहे व घरी येते असे सांगितले. त्यानंतर त्यांची मुलगी अमृता चार वाजता घरी आली तेव्हा ते तिच्यावर बडबडले की, "मी दुपारपासून तुला फोन करतो आहे तु माझा फोन का उचलत नाही." तेव्हा तिने त्यांना "मी मैत्रिणीकडे होते" असे सांगितले. त्यानंतर थोडावेळ ते घरी थांबले व त्यांच्या शेजारी बॉक्सवेल मॅच चालू होत्या, ते त्या मॅच पाहण्याकरीता सायंकाळी साडेसहा वाजता घराच्या बाहेर पडले. त्यानंतर त्यांची पत्नी सायंकाळी सात वाजता कामावरुन घरी आली असता त्यांची मुलगी तिला सूप प्यावयाचे आहे असे सांगितले व कोंबडीचे पाय आणण्याकरीता गेली.

९. सदर सा.क्र.१ यांनी आपल्या पुराव्यात पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर त्यांचे पत्नीने त्यांना साडेसात वाजता फोन केला व सांगितले की मुलगी कोंबडीचे पाय आणण्याकरीता गेली ती परत आलेली नाही. त्यानंतर त्यांनी त्यांच्या घराशेजारील सावंत यांचे चिकन सेंटर येथे जावून चौकशी केली असता त्यांनी त्यांची मुलगी त्याठिकाणी आली नाही असे सांगितले. त्यानंतर ते घरी गेले. आजुबाजूला चौकशी केली, तसेच मुलीचे मैत्रिणीकडे देखील चौकशी केली, परंतु त्यांनी मुलगी त्यांचेकडे आली नाही असे सांगितले. त्यानंतर

त्यांनी आजुबाजूला शोध घेतला परंतु त्यानंतर देखील त्यांची मुलगी मिळून आली नाही. त्यानंतर त्यांनी मुलीला फोन केला फोन लागत होता, परंतु तो फोन मुलगी उचलत नव्हती व थोड्या वेळाने तिचा फोन बंद झाला. त्यानंतर ते कणकवली पोलीस स्टेशनला गेले व पोलिसांकडे त्यांची मुलगी सापडत नाही अशी तक्रार केली. त्यांनी पोलिसांना त्यांचे मुलीला कोणीतरी उचलून पळवून नेले अशी तक्रार दाखल केली.

१०. सदर सा.क्र.०१ यांनी आपल्या पुराव्यात पुढे असे कथन केले आहे की, त्यांची मुलगी ही त्यावेळी आठवीमध्ये विद्यामंदीर हायस्कूल, कणकवली येथे शिकत होती. त्यावेळी त्यांच्या मुलीचे वय १३ वर्षे , ५ महिने, २८ दिवस इतके होते. त्यावेळी त्यांच्या मुलीकडे एमआय कंपनीचा मोबाईल होता व जीओ कंपनीचे सीम कार्ड होते. त्यांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी त्यांच्या मुलीचा शोध घेतला असता त्यांची मुलगी स्वयंभू मंदिराच्या वरती जंगलात मिळून आली व तिच्या सोबत मयूर राणे नावाचा एक मुलगा देखील होता. त्यांची मुलगी पोलिसांना दि.२२/०१/२०२२ रोजी दुपारी ०१.३० वाजणेच्या दरम्यान मिळून आली होती. त्यानंतर पोलिसांनी त्यांना पोलीस स्टेशनला बोलावून घेतले होते. ते पोलीस स्टेशनला गेले त्यावेळी त्यांची मुलगी त्याठिकाणी होती तसेच मयूर राणे नावाचा एक मुलगा देखील त्याठिकाणी होता. त्यांनी त्यांचे मुलीस काय झाले असे विचारले असता तिने सांगितले की, २१ तारखेला ती कोंबडीचे पाय आणण्याकरीता गेली असता मयूर राणे ने तिला फोन केला व तु भेटायला येतेस का असे म्हणाला तेव्हा तिने नकार दिला परंतु मयूर राणे याने त्याला

बोलावयाचे आहे ये असे सांगितले तेव्हा ती गेली. तसेच त्यांचे मुलीने त्यांना असे देखील सांगितले की, मयूर राणे याने तिला तिच्या वडिलांना मारुन टाकेन अशी धमकी दिल्याने ती मयूर राणेकडे गेली असे सांगितले. त्यावेळी त्यांचे मुलीने असे देखील सांगितले की, मयूर राणे याने त्याचेसोबत रिलेशनशीपमध्ये राहण्यास तिला खूप फोर्स केला परंतु तिने नकार दिला. तसेच तिने त्यांना सांगितले की, ती व मयूर राणे असे दोघे रात्रभर जंगलात होते. पोलिसांनी या घटनेबाबत त्यांचेकडे चौकशी केली होती व चौकशीच्या दरम्यान त्यांनी पोलिसांना त्यांचे मुलीने त्यांना जे जे सांगितले ते सांगितले होते व पोलिसांनी त्यांचा जबाब लिहून घेतला होता. ते पोलीस स्टेशनला गेले त्यावेळी मयूर राणेला पाहिले होते तो पोलीस स्टेशनमध्ये होता.

११. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी असे मान्य केले आहे की, त्यांची मुलगीला ॲन्ड्राईड फोन घेवून दिला होता. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी दिनांक २२/०१/२०२२ रोजी रात्री १.०० वाजता फिर्याद दिलेली आहे, फिर्याद दिल्यानंतर पोलिसांशी पुन्हा भेटण्याचा प्रसंग आलेला नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, घटना घडली त्यावेळी ते कनकनगर येथे राहत होते, कनकनगरपासून पोलीस स्टेशन दोन ते तीन किलोमीटर अंतरावर आहे, कनकनगरपासून चालत गेले असता दहा ते पंधरा मिनिटात पोलीस स्टेशनला जावू शकतो. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, चिकन सेंटरचे मालक समीर सावंत आहेत, परंतु चिकन सेंटरचे नाव सांगता येणार नाही, त्यांचे घरापासून समीर सावंत यांचे चिकन सेंटर चालत गेले असता पाच मिनिटाचे अंतरावर आहे. त्यांनी पुढे असे

कथन केले आहे की, ते रहात असलेला कनकनगर हा भाग दाट लोकवस्तीचा आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, सावंताचे चिकन सेंटर हे वर्दळीचा भाग आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांची मुलगी दि.२१/०१/२०२२ रोजी स्वतःच्या मर्जीने बाहेर पडली होती. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी मयूर राणे याला त्यांच्या मुलीला उचलून पळवून नेताना पाहिलेले नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, प्रतीक रासम त्यांचे शेजारी राहतो व तो ओळखीचा आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, प्रतीक रासम याचे कुटुंबाशी त्यांचे चांगले संबंध आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांची पत्नी वडापाव गाडीवर कामाला जाते. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, वडापाव गाडी मालक त्यांचे गावातील आहे व तो त्यांच्या चांगल्या संबंधातील आहे.

१२. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने पुढे असे मान्य केले आहे की, त्यांच्या मुलीकडील मोबाईल पोलिसांनी घेतलेला नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, आरोपीचे नाव त्यांना पोलिसांनी सांगितलेले होते. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, ते आरोपीला ओळखत नाही त्यामुळे आरोपीचा पूर्व इतिहास त्यांना माहीत नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, ते साडेसातच्या नंतर घरी गेले नाही, ते त्यादिवशी घरी साडेआठच्या दरम्यान गेले होते व लागलीच बाहेर पडले होते, ते सगळीकडे चौकशी करुन रात्री एक ते दीडला घरी पोहचले होते, एक ते दीड म्हणजे २१ तारखेची रात्र व २२ तारखेची पहाट त्यांनी शेजारी प्रतीक रासम यांचे कुटुंबीय तसेच मित्र सिध्देश सावंत यांचेकडे

चौकशी केली. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांना कणकवलीतील स्वयंभू मंदीर माहीत आहे, मंदीराच्या आजुबाजूला घरे आहेत. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, मंदीराच्या काही अंतरावर नदीचे पात्र आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, मंदीराच्या आजुबाजूला जंगल भाग नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, अमृताला स्वतःचे चांगले वाईटची समज आहे.

१३. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.०२ यांनी आपल्या सरतपासामध्ये सांगितले आहे की, तीच्या घरी त्यांची आई, वडील व दोन बहिणी असतात. दि.२१/०१/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता ती कनकनगर येथे चिकन सेंटरवर कोंबडीचे पाय आणण्याकरीता गेली होती. तेव्हा मयूर राणे याने तीला फोन केला व तु कोठे आहेस असे विचारले. तेव्हा तीने सांगितले की, ती कनकनगर येथे चिकन सेंटरवर कोंबडीचे पाय आणण्याकरीता आली आहे. त्यानंतर तो तीला म्हणाला की, भेटायला ये. तेव्हा ती त्याला भेटायला रेल्वे स्टेशन येथे गेली. तेथे गेल्यानंतर तो तीला म्हणाला की, तुझ्या घरचे तुला मारहाण करतात तु घरी जावू नकोस माझेसोबत ये. परंतु ती त्याला म्हणाली की, मी घरी जाते मला घरचे मारहाण करीत नाहीत. त्यानंतर तो तीला म्हणाला की, आज रात्री तु रेल्वे स्टेशनला माझेसोबत थांब. त्यानंतर ते रेल्वे स्टेशनच्या वरती असलेल्या जंगलात राहिले. त्यानंतर दुस–या दिवशी सकाळी अकरा वाजता ते स्वयंभू मंदिराच्या जंगलात गेले. त्याठिकाणी दुपारी दीडच्या दरम्यान पोलिसांनी त्यांना पकडले व पोलीस त्यांना पोलीस स्टेशनला घेवून आले. पोलिसांनी त्यांचेकडे घटनेबाबत चौकशी केली व दिनांक २२/०१/२०२२ रोजी माझा जबाब नोंदविला.

१४.		आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तीने असे मान्य केले आहे की, दिनांक २१/०१/२०२२ रोजी ते कनकनगर येथे भाडयाने राहत होते, ते राहत असलेल्या घराच्या मालकाचे नाव तीला आठवत नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीचे वडील अनिल बागवे यांचेकडे डेकोरेशनचे काम करतात. तीने पुढे असे मान्य केले आहे की, त्यांचेसोबतच पांडुरंग पालकर वै. काम करतात. तीने पुढे असे कथन केले आहे की, ती मुळ राहणार उत्तरप्रदेशची आहे, ती प्रतीक रासमला ओळखते. तीने पुढे असे मान्य केले आहे की, प्रतीक रासम तीचा मित्र आहे. तीने पुढे असे मान्य केले आहे की, त्यावेळी ती वॉटसअप, फेसबुक हाताळत होती. तीने पुढे असे मान्य केले आहे की, आरोपी मयूर राणे हा मुंबईला असतो. तीने पुढे असे मान्य केले आहे की, प्रतीक रासम हा ती भाडयाने राहत असलेल्या घराशेजारी रहात होता. तीने पुढे असे मान्य केले आहे की, प्रतीक रासम व तीचे वॉटसअपवर चॅटींग होत असे. तीने पुढे असे मान्य केले आहे की, मयूर राणेशी देखील तीचे वॉटसअपवर चॅटींग होत असे. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीचे मयूर राणेसोबत प्रेमसंबंध होते. तीने पुढे असे मान्य केले आहे की, त्यावेळी तीने मयूर राणेला तीचे घरातील लोक तीला मारहाण करतात अशा आशयाची चिठ्ठी रेल्वेस्टेशनवर दिलेली होती. तीने पुढे असे मान्य केले आहे की, पोलिसांनी त्यांना पोलीस स्टेशनला नेले त्यावेळी ती चिठ्ठी काढून घेतली होती. तीने जबाब देताना पोलिसांना तीचे मयूर राणेसोबत प्रेमसंबंध आहेत व त्यांची मोबाईलवर चॅटीग चालू आहे अशी माहिती दिली होती. तीने पुढे असे कथन केले आहे की, पोलीस स्टेशनला तीला व मयूर राणेला नेल्यानंतर पोलिसांनी त्या दोघांचे मोबाईल काढून घेतले होते.

१५. सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासात पुढे असे मान्य केले आहे की, स्वयंभू मंदिराकडे जाण्याकरीता पटकीदेवी, बाजारपेठ, वर्दळीचा रस्ता व लोकांची येजा असलेल्या ठिकाणावरुन जावे लागते. तीने पुढे असे मान्य केले आहे की, त्या रस्त्याच्या दुतर्फा लोकांची घरे आहेत. तीने पुढे असे मान्य केले आहे की, दि.२१/०१/२०२२ रोजी तीला मयूर राणे याने पळवून नेले नव्हते. तीने पुढे असे मान्य केले आहे की, मयूर राणे याने दि.२१/०१/२०२२ रोजी तसेच दि.२२/०१/२०२२ रोजीच्या दुपारपर्यंत तीचेवर कोणतीही जबरदस्ती केलेली नाही. तीने पुढे असे कथन केले आहे की, तीने मोबाईलला नेटवर्क नसल्याने त्या रात्री घरी फोन केलेला नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीला मयूर राणे विरुध्द पोलिसात तक्रार द्यावयाची नव्हती. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीचे वडिलांनी फिर्याद दिली व तीची साक्ष होणार म्हणून तीने सरकारी वकिलांच्या प्रश्नाला उत्तरे दिलेली आहेत. तीने पुढे असे मान्य केले आहे की, मयूर राणेबाबत तीची आजही काही तक्रार नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, रेल्वे स्टेशनकडून स्वयंभू मंदिराकडे जाताना ती तीच्या मर्जीने गेलेली असल्याने आरडाओरड करण्याचा किंवा लोकांकडे मदत मागण्याचा प्रसंग आलेला नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, त्यावेळी तीचेत व प्रतीक रासममध्ये "मी टॉयलेटला येतो तेथे तु मला येवून भेट" असे म्हणाला असता तीने त्याला ओके असे म्हणाले असे चॅटींग त्यांच्यात झाले होते. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीचा मोबाईल आज देखील तीचे किंवा तीचे वडिलांच्या ताब्यात नाही. तीने पुढे असे कथन केले आहे की, दि.२१/०१/२०२२ रोजी ती सायंकाळी ७.०० वाजताच घराच्या बाहेर पडली होती,

दिवसभरात ती इतर वेळी घराच्या बाहेर पडली नव्हती, त्यादिवशी तीला मैत्रिणीकडे वगैरे जाण्याचा प्रसंग आलेला नाही.

१६. अभियोगपक्षाचे सा.क्र.०३ त्यांनी आपल्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.२२/०१/२०२२ रोजी त्या कणकवली पोलिस ठाणे येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होत्या. त्यादिवशी त्यांना गुन्हा क्र.१६/२०२२ चा तपास दिला होता. त्यासोबत गुन्ह्याची खबर त्यांना देण्यात आली होती. पिडीतेच्या वडिलांनी तीचा फोन क्रमांक दिला होता, त्यावरुन पिडीतेचे ठिकाण शोधले. सदर ठिकाण कणकवली रेल्वे स्टेशन जवळ दाखवले होते. ते सदर नंबरवर सतत फोन करत होते. मुलीने एक दोन वेळा फोन उचलला होता. त्यावरुन तीचे ठिकाण कळाले होते. मोबाईलच्या लोकेशन ने तीचे ठिकाणी सापडले व तीला ते पोलिस ठाण्यात घेऊन आले. तीच्या वडिलांना मुलगी सापडल्याचे कळवले. मुलीचा जबाब महिला दक्षता समितीचे भिसे मॅडम व मुलीच्या वडिलांसमक्ष नोंदवला. मुलीची वैद्यकीय तपासणी केली. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. इतर कागदपत्रे हस्तगत केली. सीडब्ल्यूसी कणकवली येथे पत्र दिले. सीडब्ल्यूसीने मुलीला वडिलांच्या ताब्यात देण्यास हरकत नाही असा आदेश दिला. सदर दिवशी सकाळी मुलीचे राहते घराचा घटनास्थळ पंचनामा केला. त्यावेळीचे फोटो तपासकामी जोडले. मुलीच्या जबाबाचा व्हीडीओ तपासकामी पंचनामा करुन दाखल केला. त्यासोबत ६५ब चे प्रमाणपत्र जोडले. सदर दिवशी सायंकाळी आरोपीला अटक केली. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला. मुख्याधिकारी,

नगरपंचायत कणकवली यांच्याकडून मुलीचे जन्मप्रमाणपत्र प्राप्त केले. दि.२४/०१/२०२२ रोजी मुलीचा १६४ प्रमाणे जबाब नोंदवण्याकरीता न्यायालयाला पत्र दिले. दि.२६/०१/२०२२ रोजी मुलीच्या मोबाईलचे सीडीआर एसडीआर मिळणेकरीता पत्र दिले. तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

१७. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, फिर्याद ज्यांनी लिहून घेतली त्या कर्मचा–याचे नाव मी सांगू शकत नाही, मुलगी कणकवली येथील पत्त्यावर राहत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, पिडीत मुलगी ही कणकवली येथे शिकत असल्याबाबत त्यांनी कागदोपत्री पुरावा गोळा केला नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, तपासाकामी पिडीत मुलीचे व्हॉटसअॅप व फेसबुक अकाऊंट तपासले होते, तीचे व्हॉटसअॅप व फेसबुक अकाऊंट तपासले असता, पिडीत मुलगी व आरोपीचे चॅटींग व त्यातून प्रेमसंबंध असल्याचे आढळून आले नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, सीडीआर मधून आरोपी व पिडीत मुलगी या दोघांमध्ये फोन कॉल्स होत असल्याचे आढळून आले. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, पिडीत मुलीचे व्हॉट्सअॅप व फेसबुक अकाऊंटवरील मेसेजेस मिळवणे शक्य होते. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, सीडीआर मधून बरेच वेळा पिडीत मुलीने आरोपीला फोन केल्याचे दिसून येते. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांना तपासकामात असे आढळले की, आरोपी व पिडीत मुलीमध्ये लेखी व मौखिक बोलण्यावरुन त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध आहेत. त्यांनी पुढे असे

मान्य केले आहे की, त्यांच्यामधील संभाषणाबाबत त्यांनी तपासणी केली होती. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, मुलीच्या वैद्यकीय तपासणीमध्ये आक्षेपार्ह काही आढळून आले नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, नि.क्र.पी२/पीडब्ल्यू३ प्रमाणे तपासाचे काम पो.ना/८२९ पी.डी.पांढरे यांच्याकडे सोपवण्यात आले. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांच्या नावामध्ये खाडाखोड करुन त्यांचे नाव लिहण्यात आले आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांनी तपासकामी हस्तगत केलेल्या वीजबिला मध्ये मुलीचे किंवा तीच्या वडिलांचे नाव नमूद नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी ब–याच वेळा न्यायालयात साक्ष दिली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, लोकेशन ट्रेस केलेला सीम कोणाच्या नावे होता याची चौकशी त्यांनी केली नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांच्या तोंडी शब्दांशिवाय त्यांनी ट्रेस केलेला सीम पिडीत मुलीचा होता याबाबत त्यांच्याकडे इतर कागदोपत्री पुरावा नाही.

१८. सदर साक्षीदार यांनी आपल्या उलटतपासात पुढे असे मान्य केले आहे की, दोषारोपपत्रामध्ये नमूद घटनास्थळ वर्दळीचे आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, सदर वर्दळीच्या ठिकाणावरुन तपासटिपण नोंदवण्यात आले नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, पंचनामा करण्यासाठी घटनास्थळावर स्वतंत्र पंच मिळणे शक्य होते. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिक रासम या इसमाला तपासकामी भेटलेले नाही, त्याचे टिपण नोंदवलेले नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पंचनाम्यातील काढलेले फोटो हे कोणी काढले व कोणत्या यंत्राने काढले हे त्यांना माहिती नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, वैद्यकीय

प्रमाणपत्र त्यांनी स्वतः मिळवलेले नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, घटनास्थळाच्या घर मालकाचे तपास टिपण नोंदवले नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांच्याकडे तपासकाम येण्यापुर्वी फिर्यादीचा जबाब नोंदवलेला आहे. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, फिर्यादीचा जबाब त्यांनी नोंदवलेला नाही. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांच्या तपासामध्ये आरोपीचे व पिडीत मुलीचे प्रेमसंबंध होते असे निष्पन्न झाले होते.

१९. एकंदरीत पिडीता हिची साक्ष व उलटतपास विचारात घेता पिडीता स्पष्टपणे ती स्वतःच्या इच्छेने व मर्जीने आरोपीसोबत गेलेली होती व तिच्यावर कसलीही जबरदस्ती केलेली नव्हती तसेच गेलेल्या ठिकाणी मोबाईल फोनला नेटवर्क नसल्याने ती गेल्याची माहिती तिच्या वडिलांना कळवू शकली नाही असे कबूल करते. स्वतः फिर्यादी यांनी आपल्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, त्यांची मुलगी ही स्वतःच्या मर्जीने घराबाहेर पडली होती, आरोपीने त्यांच्या मुलीला उचलून पळवून नेताना त्यांनी पाहिले नाही, त्यांच्या मुलीला चांगले वाईटाची समज आहे. तर सा.क्र.२ पिडीता हिने देखील आपल्या उलटतपासात मान्य केले आहे की, तीचे आरोपीसोबत प्रेमसंबंध होते, घरातील लोक तीला मारहाण करतात अशा आशयाची चिठ्ठी तीने आरोपीला रेल्वे स्टेशन येथे दिली होती. तसेच म्हत्वपूर्ण म्हणजे स्वतः पिडीता हिने आपल्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, दि.२१/१/२०२२ रोजी आरोपीने तीला पळवून नेले नव्हते तसेच तीने असे देखील मान्य केले आहे की, दि.२१/१/२०२२ ते दि.२२/१/२०२२ रोजीच्या दुपारपर्यंत आरोपीने कोणतीही

जबरदस्ती केली नाही. तीने पुढे असे देखील मान्य केले आहे की, तीला आरोपीविरुध्द तक्रार द्यायची नव्हती व तीची आजही आरोपीविरुध्द तक्रार नाही. तेव्हा एकंदरीतच सदर पिडीतेच्या साक्षीतील कबूली व फिर्यादीच्या साक्षीतील कबूली विचारात घेता पिडीता ही तिच्या वडिलांच्या घरातून स्वतःच्या मर्जीने गेली असल्याचे स्पष्ट होते व त्यामध्ये आरोपीचा कोणताही सहभाग नसल्याचे देखील अभिलेखावरील पुराव्यावरुन सिध्द होते.

२०. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी सा.क्र.१ हे प्रस्तुत घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. आरोपीने पिडीतेस फूस लावून नेले, धमकी दिली अथवा जबरदस्ती केली ही बाब त्यांनी स्वतः पाहिलेली नसून त्यांनी आपल्या मुलीने त्यांना नंतर सांगितलेल्या गोष्टींवर आधारित कथन केलेले आहे. आरोपीने पिडीतेस उचलून पळवून नेताना त्यांनी पाहिलेले नाही अशी स्पष्ट कबुली त्यांनी उलटतपासात दिलेली आहे. त्यामुळे, त्यांची साक्ष ही बहुतांश अंशी ऐकीव स्वरुपाची ठरते. अशा परिस्थितीत पिडीतेची साक्ष अत्यंत महत्वाची ठरते. परंतु स्वतः पिडीताच अभियोग पक्षाच्या कथनास पूर्णपणे दुजोरा देत नसल्याने फिर्यादीच्या साक्षीवर स्वतंत्रपणे विसंबून दोषसिद्धी करणे सुरक्षित ठरत नाही.

२१. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१ यांनी आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ते दुपारी एक वाजता कामावरुन जेवणाकरीता घरी आले तेव्हा त्यांची मुलगी घरी नव्हती, त्यांनी तीला फोन केला तेव्हा तीने मैत्रीणीकडे आहे व घरी येते असे सांगितले, त्यानंतर त्यांची मुलगी चार वाजता घरी आली तेव्हा ते

तीच्यावर बडबडले की दुपारपासून तुला फोन करतो आहे तू माझा फोन का उचलत नाही, त्यावर तीने सांगितले की, ती मैत्रीणीकडे होती. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, ज्या मैत्रीणीकडे त्यांची मुलगी गेली होती तीच्याकडे शोध घेण्याचा प्रसंग त्यांना आला नाही, ती कोणती मैत्रीण आहे याचा शोध त्यांनी घेतला नाही. तसेच, त्यांची मुलगी ते घरी आल्यानंतर घरी नव्हती असे पोलिसांना जबाब देताना त्यांनी सांगितले होते परंतू सदर मजकूर त्यांच्या जबाबात का नमूद नाही याचे कारण त्यांना सांगता येणार नाही असे कथन केले आहे. तर सा.क्र.०२ पिडीता हिने स्वतः आपल्या उलटतपासात कथन केले आहे की, दि.२१/१/२०२२ रोजी ती सायंकाळी ०७.०० वाजताच घराच्या बाहेर पडली होती, दिवसभरात ती इतर वेळी घराच्या बाहेर पडली नव्हती. तीने पुढे असे देखील कथन केले आहे की, तीला त्यादिवशी मैत्रीणीकडे वगैरे जाण्याचा प्रसंग आला नाही. सबब, सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीत सदर महत्वपूर्ण बाबी बाबत विसंगती दिसून येते. त्यामुळे, सदर साक्षीदारांच्या साक्षीवर संशय निर्माण होतो.

२२. महत्वपूर्ण म्हणजे सदर घटना रेल्वे स्टेशन व स्वयंभु मंदीराच्या परीसरात घडल्याचे अभिलेखावर आलेले आहे. सा.क्र.०१ फिर्यादी यांनी आपल्या उलटतपासात मान्य केले आहे की, स्वयंभू मंदीराच्या बाजूला घरे आहेत, काही अंतरावर नदी पात्र आहे व मंदीराच्या आजुबाजूला जंगल भाग आहे. तसेच, सा.क्र.२ पिडीता यांनी देखील आपल्या उलटतपासात मान्य केले आहे की, रेल्वे स्टेशनकडून स्वयंभू मंदीराकडे जाताना पटकीदेवी, बाजारपेठ असा वर्दळीचा रस्ता आहे व सदर ठिकाणाहून लोकांची ये जा चालू असता तसेच

सदर रस्त्याच्या दुतर्फा लोकांची घरे आहेत. तसेच, सदर पिडीता हिने असे देखील मान्य केले आहे की, रेल्वे स्टेशनकडून स्वयंभू मंदीराकडे जाताना ती आपल्या मर्जीने गेल्याने आरडाओरडा करण्याचा किंवा लोकांकडे मदत मागण्याचा तीला प्रसंग आला नाही. सा.क्र.३ तपास अधिकारी यांनी देखील आपल्या उलटतपासात मान्य केले आहे की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे, सदर वर्दळीच्या ठिकाणावरुन तपासटिपण नोंदवण्यात आले नाही. सबब, फिर्यादी व पिडीता व्यतिरीक्त इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. तेव्हा अशा परिस्थितीत प्रस्तुत घटनेवर संशय निर्माण होतो.

२३. प्रस्तुत प्रकरणातील परिस्थितीजन्य बाबी विचारात घेतल्या असता पिडीता ही आरोपीसोबत रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, पटकीदेवी परिसर, स्वयंभू मंदिर परिसर अशा वर्दळीच्या व लोकांची सतत येजा असलेल्या ठिकाणांमधून फिरल्याचे अभिलेखावर आलेले आहे. अशा परिस्थितीत जर आरोपीने प्रत्यक्षात जबरदस्तीने किंवा धमकी देवून तिला नेले असते तर पिडीतेस मदतीकरीता आरडाओरडा करण्याची, आजूबाजूच्या लोकांकडे मदत मागण्याची किंवा कोणत्याही व्यक्तीस सदर बाब सांगण्याची संधी उपलब्ध होती. मात्र, पिडीतेने स्वतःच अशा प्रकारचा कोणताही प्रसंग उद्भवला नसल्याचे मान्य केले आहे. सदर बाब अभियोग पक्षाच्या कथनाशी विसंगत ठरते.

२४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.०३ तपासिक अंमलदार असून त्यांनी आपल्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, पंचनामा

करण्यासाठी घटनास्थळावर स्वतंत्र पंच मिळणे शक्य होते, प्रतिक रासम या इसमाला तपासकामी त्या भेटलेल्या नाही, त्याचे तपास टिपण नोंदवलेले नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, घटनास्थळाच्या घर मालकाचे तपास टिपण नोंदवले नाही. तसेच, सदर साक्षीदाराने आपल्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, पंचनाम्यातील काढलेले फोटो हे कोणी काढले व कोणत्या यंत्राने काढले हे त्यांना माहिती नाही, त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांनी स्वतः मिळवलेले नाही, फिर्यादीचा जबाब त्यांनी नोंदवलेला नाही, लोकेशन ट्रेस केलेला सीम कोणाच्या नावे होता याची चौकशी त्यांनी केली नाही, फिर्याद ज्यांनी लिहून घेतली त्या कर्मचा–याचे नाव त्या सांगू शकत नाही, पिडीता कणकवली येथील पत्त्यावर राहत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही, पिडीत मुलगी ही कणकवली येथे शिकत असल्याबाबत त्यांनी कागदोपत्री पुरावा गोळा केला नाही. स्वतः तपासिक अंमलदार असून देखील त्यांनी दिलेल्या कबुलीवरुन त्यांना स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध असून देखील त्यांनी स्वतंत्र अशा साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. त्यामुळे, त्यांनी केलेल्या तपासकामाबाबत साशंकता निर्माण होते. त्यांनी असे मान्य केले आहे की, नि.क्र.पी२/पीडब्ल्यू३ प्रमाणे तपासाचे काम पो.ना/८२९ पी.डी.पांढरे यांच्याकडे सोपवण्यात आले. परंतू, प्रस्तूत कामी पांढरे यांची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही.

२५. अभिलेखावरून असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये मोबाईल फोन, कॉल डिटेल रेकॉर्ड, व्हॉटसॲप चॅटींग, फेसबुक मेसेजेस व इतर इलेक्ट्रॉनिक पुरावा उपलब्ध होणे शक्य होते. तपास अधिकारी यांनी स्वतः कबूल केले आहे की, आरोपी व पिडीतेमध्ये

फोनद्वारे संभाषण होत होते तसेच त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. असे असूनही अभियोग पक्षाने सदर इलेक्ट्रॉनिक पुरावा न्यायालयासमोर सादर केलेला नाही. उपलब्ध असूनही सर्वोत्तम पुरावा सादर न करणे ही बाब अभियोगपक्षाच्या विरुध्द जाते. विशेषतः जेव्हा संपूर्ण प्रकरण हे आरोपी व पिडीता यांच्यातील पूर्वपरिचय, संभाषण व संबंध याभोवती फिरते, तेव्हा अशा इलेक्ट्रॉनिक पुराव्याचे महत्व अधिक वाढते.

२६.		तसेच तपास अधिकारी पाटील या जरी सरतपासात तपासाअंती आरोपीने फिर्यादीच्या मुलीला कोणाचीही संमती न घेता फूस लावून पळवून नेलेले आहे असे निष्पन्न झाले असे सांगत असले तरी आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्या कबूल करतात की, त्यांचे तपासकामात सीडीआर मधून आरोपी व पिडीता यांच्यामध्ये फोन कॉल्स होत असल्याचे आढळून आले तसेच सदर फोन कॉल्स हे ब–याच वेळा पिडीतेने आरोपीला केल्याचे देखील दिसून आले. तसेच, त्यांनी पुढे असे देखील मान्य केले आहे की, त्यांच्या तपासकामात मौखिक बोलण्यावरुन आरोपी व पिडीतेचे प्रेमसंबंध असल्याचे त्यांना आढळून आले. सदर साक्षीदार तपासिक अंमलदार असून देखील त्यांनी आपल्या उलटतपासात असे कथन केले आहे की, त्यांनी तपासकामात पिडीतेच्या मोबाईलमधले एसएमएस तपासले होते किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. तपासिक अंमलदार यांनी पुढे असे मान्य केले आहे की, अपहृत मुलीच्या वैद्यकीय तपासणीमध्ये कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आलेली नाही. त्यांनी दोषारोपपत्रात अपहृत मुलगी व आरोपी यांच्यातील व्हॉटसअप, एसएमएस, फेसबुक यातील संभाषणाचे रेकॉर्ड दाखल केलेले नाहीत.

२७. भारतीय दंड संहिता कलम ३६३ मधील अपनयनाचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी अल्पवयीन मुलीस तिच्या कायदेशीर पालकांच्या देखरेखीतून आरोपीने नेले अथवा फूस लावून बाहेर काढले असल्याचे अभियोग पक्षाने संशयापलिकडे जावून सिद्ध करणे आवश्यक असते. केवळ अल्पवयीन मुलगी आरोपीसोबत आढळून आली ही बाब स्वतःमध्ये दोषसिद्धी करण्यास पुरेशी ठरत नाही. प्रस्तुत प्रकरणात पिडीता स्वतः आरोपीकडे तिच्या मर्जीने गेल्याचे सांगते. आरोपीने कोणती फूस लावली, कोणती सक्रिय कृती करून तिला पालकांच्या देखरेखीतून बाहेर काढले अथवा कोणत्या प्रकारे तिला प्रवृत्त केले याबाबत अभिलेखावर ठोस व विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे कलम ३६३ भारतीय दंड संहितेतील आवश्यक घटक अभियोग पक्ष सिद्ध करू शकलेला नाही.

२८. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाचा संपूर्ण खटला हा पिडीतेच्या साक्षीवर आधारित आहे. परंतु पिडीतेची साक्ष स्वतः अभियोग पक्षाच्या कथनाशी सुसंगत राहत नाही. तिच्या साक्षीतून आरोपीने तिला जबरदस्तीने नेले, धमकी दिली अथवा ताब्यात ठेवले असे स्पष्टपणे सिद्ध होत नाही. उलट तिच्या उलटतपासातील कबुलीमुळे अभियोग पक्षाच्या कथनामध्ये गंभीर शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत दोषसिद्धी करण्यासाठी आवश्यक असलेला विश्वासार्ह व अखंड पुराव्याचा साखळी अभिलेखावर उपलब्ध नाही.

२९. तसेच भारतीय दंड संहिता कलम ५०६ मधील गुन्हा सिद्ध होण्यासाठी आरोपीने फिर्यादी अथवा पिडीतेस जाणीवपूर्वक अशा प्रकारची धमकी दिलेली असणे

आवश्यक आहे की ज्यामुळे संबंधित व्यक्तीच्या मनात भय निर्माण होईल. प्रस्तुत प्रकरणात पिडीतेने न्यायालयासमोर दिलेल्या साक्षीत आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत स्पष्ट, ठोस व विश्वासार्ह कथन केलेले नाही. उलट तीने आरोपीने तिच्यावर कोणतीही जबरदस्ती केली नसल्याचे मान्य केले आहे. फिर्यादी यांची साक्ष ही या बाबतीत ऐकीव स्वरुपाची आहे. त्यामुळे फौजदारीपात्र धाकदपटशाचा गुन्हा देखील अभियोग पक्ष संशयापलिकडे जावून सिद्ध करू शकलेला नाही.

३०. एकंदरीत तपास अधिकारी याचे कबूली विचारात घेता अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत करण्यात आल्याप्रमाणे घटना याबाबतच संशय निर्माण होतो. महत्वपूर्ण म्हणजे पिडीताच अभियोगपक्षास दुजोरा देत नाही. एकंदरीत वर नमूद करण्यात आल्याप्रमाणे आरोपी याने पिडीतेस ती अल्पवयीन असल्याचा फायदा घेवून तिचे पालकाच्या संमत्तीशिवाय त्यांच्या कायदेशीर देखरेखीतून तिचे अपनयन केले व फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली असा सबळ व संशयापलिकडे जावून अभिलेखावर पुरावा आलेला नाही.

३१. आरोपीने पिडीतेस ती अल्पवयीन असल्याचा फायदा घेवून तिच्या पालकाच्या संमत्तीशिवाय कायदेशीर देखरेखीतून तिचे अपनयन केले व फिर्यादीचे मुलीस फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जीवे मारण्याची धमकी दिली असा ठोस व संशयापलिकडे जावून सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र ठरतो. त्यामुळे अभियोग

पक्षाच्या त्रोटक व तोकड्या पुराव्या आधारे आरोपीने गुन्हा केला या निष्कर्षाप्रत येण्यास कोणताही वाव राहत नाही. अभियोगपक्षाचा खटला हा संशयाच्या परिघामध्ये असून कोणत्याही शंकेच्या पलिकडे जावून शाबीत झालेला नाही. त्यामुळे आरोपीस या गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. आरोपीविरूध्दचा गुन्हा शाबीत करण्यास सरकार पक्ष पूर्णतः अपयशी ठरला आहे. करीता मी मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीताः–**

३२. मुद्दे क्र. १ व २ च्या निष्कर्षावरुन, मुद्दा क्र. ३ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी मयुर विकास राणे, यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३६३ व ५०६ च्या शिक्षापात्र गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. या न्यायनिर्णयाविरूध्द अपील दाखल झाल्यास मा.अपिलिय न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे रू.१५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.05.08 17:04:07 +0530

( शुभम जी. लटुरिया )

दिनांकः– ०८/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग १, कणकवली.

भाग 'क'

(फौजदारी नियमावलीचे परिच्छेद क्रमांक ४४ (३) प्रकरण क्रमांक ६)

अभियोग पक्षाचे/बचाव पक्षाचे/न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्ष :-

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | फिर्यादी | फिर्यादी |
| सा.क्र.२ | फिर्यादीची मुलगी/पिडीता | साक्षीदार |
| सा.क्र.३ | धनश्री सुरेश पाटील | तपासिक अंमलदार |

ड. फिर्यादी/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांची यादी :-

अ. अभियोग पक्ष :-

| **अ.क्र.** | **वर्णन** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| ०१ | फिर्याद | पी१/पीडब्ल्यू१ |
| ०२ | तपास आदेश | पी२/पीडब्ल्यू३ |

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2026.05.08 17:04:02 +0530

( शुभम जी. लटुरिया )

दिनांक:- ०८/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग १, कणकवली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| 1.Name of Stenographer | :- Smt.A.N.Dhuri (A.A.Kudalkar) |
| 2.Name of Court | :- Civil & Criminal Court Kankavali |
| 3.Date | :-08/05/2026 |
| 4.Judgment signed by Presiding Officer | :- 08/05/2026 |
| 5.Judgment uploaded on | :- 08/05/2026 |

---